दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

●www.lokrakshanay.com
●epaper.lokrakshanay.com
●dainiklokrakshanay@gmail.com
●+ 91 97023 86118

सहसंपादक : अनिकेत घनश्याम भंकाळ

वर्ष - ०२, अंक - ०५, पृष्ठ ६ | ठाणे, मंगळवार, ०७ मे २०२४ | RNI.REG.NO. MAHBIL/2023/86118 | रुपये : २/-

संपादकीय....

या गॅरंटीचे काय?



(पान २ वर)

## शिवसेना आणि धनुष्यबाण आमच्या हातात दिल्याबद्दल मोदी, शाह यांचे आभार मानतो - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे, यश सावंत :**

ठाणे येथील टिपटॉप प्लाझा येथे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारार्थ आयोजित महायुतीच्या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाच्या लालसेपोटी सर्व गमावले. सोन्यासारखी माणसे सोडून गेली. पक्ष हातातून गेला. बाळासाहेबांचे विचार गेले. पण, मी स्वत:ला भाग्यवान समजतो. धनुष्यबाण, बाळासाहेबांचे विचार आणि जनता आमच्यासोबत आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह हे दोघेही सांगतात की, असली शिवसेना एकनाथ शिंदे यांची तर, नकली शिवसेना उद्धव ठाकरे यांची आहे, असेही ते म्हणाले. मी राज्यात जेव्हा मोठा कार्यक्रम केला. तेव्हा भाजपच्या वरिष्ठांना सांगितले की, मी माझे काम केले आहे, आता तुम्ही तुमचे काम करा. त्यानंतर त्यांनी शिवसेना आणि धनुष्यबाण आमच्या हातात दिला. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांचे आभार मानतो, असे वक्तव्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाण्यातील महायुतीच्या मेळाव्यात बोलताना केले. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना उद्धव ठाकरे यांना भाजपचे २० ते २५ आमदार फोडायचे होते, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

(पान २ वर...)

## नवी मुंबईत नव्या स्मार्ट प्रकल्पांचे स्वागतच, मात्र रखडलेल्या योजनाही मार्गी लावण्यासाठी नागरिकांची मागणी

**नवी मुंबई, भावना जैन :**

स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत असलेल्या नवी मुंबई शहरात अनेक 'स्मार्ट' प्रकल्प राबवले जात आहेत. त्यामुळे शहराचा नावलौकिक वाढत आहे. एकीकडे हे स्मार्ट प्रकल्प राबवत असताना दुसरीकडे शहरातील प्राथमिक गरजांकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. नवीन रस्ते, उड्डाणपूल उभारले जात आहेत, त्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे तर दुसरीकडे, प्राणीपक्ष्यांच्या गरजांकडे, त्यांना आरोग्यसुविधा देण्यात हेळसांड केली जात आहे. नवीन होणाऱ्या प्रकल्पांचे स्वागत आहेच, मात्र रखडलेल्या योजनाही मार्गी लावाव्यात, अशी नागरिकांची मागणी आहे.




नवी मुंबईत प्राण्यांसाठी दवाखाना असावा, यासाठी महापालिकेच्या वतीने १५ वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. प्राण्यांच्या दवाखान्यासाठी भूखंड मिळत नव्हता. मात्र अखेरीस जुईनगर येथे भूखंड मिळाल्यावर येथे प्राण्यांसाठी प्रशस्त असा दवाखाना उभारण्यात आला आहे. मात्र तीन मजली दवाखान्याची इमारत धूळ खात पडून आहे. प्राण्यांचा दवाखाना तयार असूनही तो सुरू झालेला नाही. त्यामुळे भटक्या प्राण्यांचे उपचाराविना हाल होत आहेत.

राज्य सरकारने ज्याप्रमाणे त्या त्या महापालिकांना त्यांच्या भागातील भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी श्वान नियंत्रक कार्यक्रम राबवण्यास सांगण्यात आले आहे, त्याचप्रमाणे दोन वर्षांपूर्वी भटक्या मांजरींच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण

(पान २ वर...)

## अशक्य वाटणारे शक्य! रेल्वेतून चोरीस गेलेल्या वस्तू परत मिळणार




**नागपूर, नितीन देवळेकर :**

रेल्वे स्थानक, धावत्या गाडीतून चोरी गेलेल्या, हरवलेल्या वस्तू परत मिळणे जवळजवळ अश्यकच असते, परंतु रेल्वे सुरक्षा दलाने मनावर घेतले आणि योग्य दिशेने तपास केल्यास चोरी गेलेल्या वस्तू मिळवल्या जाऊ शकतात, असाच काही अनुभव मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात आला. एप्रिल महिन्यात आरपीएफने सात लाखांहून अधिक किंमतीच्या वस्तू प्रवाशांना परत मिळवून दिल्या आहेत.

(पान २ वर...)

## कल्याणमधील हरितपट्ट्यावरील जीन्सचे ३२ कारखाने जमीनदोस्त, प्रदुषणाने परिसरातील नागरिक होते त्रस्त

> चिंचपाडा, व्दारली भागात काही वर्षापूर्वी हरितपट्टा नष्ट करून ३२ जीन्स कारखाने उभारण्यात आले होते. या कारखान्यांच्या प्रदुषणाने स्थानिक नागरिक खूप त्रस्त होते. या कारखान्यांविषयी तक्रारी वाढल्या होत्या. हे कारखाने बेकायदा असल्याने ते जमीनदोस्त केले. या कारखान्यांना अधिकृत, चोरून वीज मिळणार नाही याची काळजी महावितरणने घेणे गरजेचे आहे.
>
> – हेमा मुंबरकर, साहाय्यक आयुक्त, आय प्रभाग, कल्याण.



**कल्याण, रोहित जैसवाल :**

कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, व्दारली भागातील हरितपट्टा नष्ट करून उभारलेले प्रदुषणकारी जीन्सचे ३२ कारखाने आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी अतिक्रमण नियंत्रण पथकाच्या साहाय्याने शनिवारी भुईसपाट केले. या कारखान्यांमुळे परिसरात जलप्रदूषण, हवेतील प्रदूषण वाढल्याने परिसरातील नागरिक त्रस्त होते. काही वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून उल्हासनगर शहरातील नागरी वस्तीमधील प्रदुषणकारी जीन्सचे कारखाने हटविण्यात आले. या कारखान्यांमुळे प्रदूषण होत असल्याने परिसरातील नागरिकांनी आपल्या भागात हे कारखाने पुन्हा सुरू होणार नाहीत याची काळजी घेतली होती. अलीकडे काही कारखाना चालक स्थानिकांना हाताशी धरून सरकारी, आरक्षित मोकळ्या, वन जमिनींचा ताबा घेऊन त्यावर शासनाच्या कोणत्याही परवानग्या न घेता जीन्सचे कारखाने सुरू करत आहेत.

(पान २ वर...)

## सोसायट्यांवर राहणार 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा'ची नजर, पाण्याच्या गैरवापरावर घालणार लगाम

**पुणे, अभिजित येरल्लु :**

बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेताना मोठ्या सोसायट्यांना बंधनकारक असलेले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) प्रत्यक्षात कार्यान्वित आहेत का, सोसायट्यांकडून या प्रकल्पांचे व्यवस्थापन कसे केले जाते, यावर महापालिकेबरोबरच आता 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा'चीही (एमपीसीबी) नजर राहणार आहे. शहरातील पाण्याची मागणी वाढत असतानाच अनेक सोसायट्यांमध्ये सुरू असणाऱ्या पाण्याच्या अतिवापराच्या धर्तीवर 'एमपीसीबी'ने हा निर्णय घेतला आहे. पुण्यामध्ये

MAHARASHTRA

Maharashtra Pollution Control Board
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

तीनशेहून आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोनशेहून अधिक मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या आहेत. या सर्वांना सांडपाणी पुनर्वापराचा नियम लागू होतो. प्रत्यक्षात मात्र, पन्नास टक्के सोसायट्यांमध्येही हे प्रकल्प पूर्णपणे कार्यरत नसल्याची माहिती पुढे आली आहे. राज्य सरकारच्या नियमानुसार दोन लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या शहरातील


(पान २ वर...)

## कोळीवाडे आणि गावठाणातील रहिवाशांकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजना नकोची होतेय मागणी

**मुंबई, विशाल कारंडे :**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर विविध रहिवासी संघटना आपल्या मागण्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध करत आहेत. कोळीवाडे आणि गावठाणांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनीही आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. कोळीवाड्यांचे आणि गावठाणांचे सीमांकन करावे, कोळीवाड्यांसाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली आणावी, कोळीवाड्यांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना नको अशा मागण्यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

मुंबई ४१ कोळीवाडे आणि ८८ गावठाणे आहेत.



हे कोळीवाडे म्हणजे जुन्या मुंबईची ओळख आहे. या कोळीवाड्यांचे प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून तसेच आहेत. दरवेळी राजकीय पक्षांतर्फे या कोळीवाड्यांच्या विकासासाठी सीमांकन करण्याचे, विकास नियंत्रण नियमावली आणण्याचे आश्वासन दिले जाते. मात्र ही आश्वासने पूर्ण होत नाहीत. त्यामुळे आता मुंबईतील कोळीवाड्यांसाठी एक जाहीरनामा तयार करण्यात आला आहे. वॉचडॉग फाऊंडेशन या सामाजिक संस्थेचे पिमेंटा गॉडफ्रे यांनी सांगितले की, या जाहीरनाम्यात कोळीवाड्यांच्या सीमांकनाची

(पान २ वर...)

## बहुजन विकास आघाडीला आपली पारंपरिक 'शिट्टी' निशाणी कायम ठेवण्यात यश

**वसई, सचिन कदम :**

पालघर लोकसभा मतदारसंघातील प्रमुख दावेदार असलेल्या बहुजन विकास आघाडीने आपली पारंपरिक शिट्टी निशाणी कायम ठेवण्यात यश मिळवले आहे. पक्षाचे उमेदवार राजेश पाटील आता शिट्टी चिन्हावर प्रचार करणार आहे. शिट्टी मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पसरला असून यामुळे विजय सोप्पा होणार असल्याचा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. बहुजन विकास आघाडीची वसई विरार महापालिकेत निर्विवाद सत्ता असते. शिट्टी ही निशाणी या पक्षाचे पारंपरिक चिन्ह. सर्व निवडणुका या शिट्टी चिन्हावर लढविण्यात




येत होत्या. त्यामुळे शिट्टीवाले अशी ओळख होती. परंतु मागील निवडणुकीत एका स्थानिक पक्षाच्या माध्यमातून शिट्टी चिन्ह पळविण्यात आले होते. त्यामुळे यंदा शिट्टी चिन्ह वाचविण्यासाठी पक्षाने प्रयत्न केले. अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी राजेश पाटील यांनी अर्ज दाखल केला होता. सोमवारी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर

(पान २ वर...)

## कल्याण शिळफाटा उड्डाणपूलाच्या उर्वरित तीन मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या

**ठाणे, दिगंबर जाधव :**

कल्याण शीळ मार्गावरील शिळफाटा सहा पदरी उड्डाणपुलाच्या उर्वरित तीन मार्गिका नुकत्याच सुरू करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या पुलाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली करण्यात आली होती. तर नुकतीच या पुलाची दुसरी बाजू देखील वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. या शिळफाटा सहा पदरी उड्डाणपुलामुळे शिळफाटा चौकातला प्रवास वेगवान झाला आहे. तर कल्याण, डोंबिवली,



अंबरनाथ, बदलापुरातून ठाणे, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळाला असल्याने वाहनचालकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर तसेच आसपासच्या भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना ठाणे, नवी मुंबईला जाण्यासाठी कल्याण शीळ मार्ग हा अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मागील वर्षी या रस्त्याचे सहापदरीकरण

(पान २ वर...)

## 'टेप रेकॉर्डरसारखे काम करू नका'; सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीवेळी इतर न्यायालयांच्या कामकाजाबाबत केले भाष्य



**नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

सर्वोच्च न्यायालयासमोर अनेक महत्वाच्या प्रकरणांची सुनावणी होत असते. सुनावणीनंतर न्यायालय अनेक महत्वाचे निर्णय देत असते. तसेच न्यायालयासमोर होणाऱ्या सुनावणीवेळी अनेक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले जात असतात. आता सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीवेळी इतर न्यायालयांच्या कामकाजाबाबत भाष्य केले आहे. 'न्यायालयांनी फक्त टेप रेकॉर्डर सारखे काम करू नये', असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'न्यायालयांनी खटल्यांच्या सुनावणी वेळी सहभागाची भूमिका बजावली पाहिजे. तसेच साक्षीदारांच्या साक्ष नोंदवताना फक्त टेप रेकॉर्डर म्हणून काम न करता फौजदारी खटल्यांच्या सुनावणीवेळी सरकारी वकील साक्षीदारांची कोणतीही प्रभावी आणि अर्थपूर्ण उलटतपासणी करत नाहीत.

(पान २ वर...)

## वाढवण बंदराची उभारणी झाल्यास १० लाख रोजगारनिर्मिती होणार, 'जेएनपीए'च्या अध्यक्षांचा विश्वास



**पालघर, विशाल पाटील :**

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे (जेएनपीए) सध्या सुरू असणारा विस्तारीकरण प्रकल्प एप्रिल २०२५ मध्ये पूर्णपणे कार्यरत होणार आहे. वाढवण बंदराची उभारणी झाल्यास पुढील १० वर्षांत १० लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असून महाराष्ट्राचे भविष्य पालघरमध्ये राहणार असल्याचे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेश वाघ यांनी केले. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचा विस्तारीकरण प्रकल्प अंतिम टप्प्यात असून बंदरातील पद्धतींमधील कार्यक्षमता वाढवली तरी या बंदरात सध्या हाताळणी होणाऱ्या सुमारे साडेसहा दशलक्ष कंटेनरचे प्रमाण १० दशलक्षांपर्यंत पोहोचू शकेल अशी शक्यता आहे. अशा स्थितीत देशातील निर्यात व आयात क्षेत्रात होणारी वाढ व होणारा औद्योगिक विकास पाहता भविष्याच्या दृष्टिकोनातून वाढवण येथे बंदर उभारणी करणे आवश्यक झाल्याचे वाघ यांनी सांगितले. बंदराची आखणी करणे व संकल्पना करून प्रत्यक्ष उभारणी करण्याची प्रक्रिया ही सुमारे १० वर्षांची असल्याने या दृष्टीकोनातून बंदर उभारणीसाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. वाढवण येथील प्रस्तावित बंदराला पर्यावरण विभागाची मान्यता मिळाली असून सार्वजनिक गुंतवणूक मंडळाची मंजुरी अद्याप मिळालेली नाही. सध्या निवडणूक आचारसंहिता असल्याने मंत्रिमंडळाकडून परवानगी मिळू शकली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जेएनपीए येथे सध्या १५ मीटरची खोली प्राप्त असून त्या ठिकाणी १७ हजार कंटेनर क्षमता असणाऱ्या जहाजांची नांगरणी होणे शक्य होणार आहे. मात्र वाढवण येथे १८ ते २० मीटरची नैसर्गिक खोली प्राप्त असून २४ हजार कंटेनर क्षमतेपेक्षा अधिक जहाजांची बंदरात नांगरणी शक्य होणार असून त्यामुळे भारताची सिंगापूर, कोलंबो व इतर आंतरराष्ट्रीय बंदरांवरील

(पान २ वर...)

# संपादकीय.....

## या गॅरंटीचे काय?

अंगणवाडी ताईंपासून ते मोठया सरकारी रुग्णालयापर्यंतची यंत्रणा हा आपल्या आरोग्य व्यवस्थेचा कणा. तो मोडतो आहे, हे मुंबईतल्या माता–बालमृत्यूमुळे दिसले.

देशाची आर्थिक राजधानी, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याची राजधानी, अशी बिरुदे मिरवणाऱ्या मुंबईत, पालिका रुग्णालयात बाळंतपणादरम्यान एका मातेचा बाळासह मृत्यू होणे, ही खरे तर सरसकट सगळयांनाच शरमेने मान खाली घालायला लावणारी घटना आहे. एकीकडे याच शहरात वेगवेगळया शाखांमधले सुपरस्पेशालिटी डॉक्टर्स, सुपरस्पेशालिटी रुग्णालये उपलब्ध आहेत, देशाच्या कानाकोपऱ्यातून उपचारांसाठी रुग्ण येथे धाव घेत असतात, मेडिकल टुरिझम म्हणजेच वैद्यकीय पर्यटन ही संकल्पनाही आपल्याकडे चांगली रुळलेली असल्यामुळे इथल्या तुलनेत



किफायतशीर आणि तज्ज्ञ उपचारांसाठी दरवर्षी जवळपास ७८ देशांमधून २० लाख रुग्ण वेगवेगळया शाखांमधल्या उपचारांसाठी भारतात येत असतात. असे सगळे असणाऱ्या शहरात, देशात एक साधे बाळंतपण निर्धोक असू नये? जेमतेम दोन महिन्यांपूर्वी 'एका कवितेच्या मृत्यूचे कवित्व' (२ मार्च २०२४) या संपादकीयात सरकारी यंत्रणेच्या अजागळपणापायी नंदुरबार जिल्ह्यात बाळंतपणादरम्यान मरण पावलेल्या एका मातेच्या मृत्यूची दखल घेण्यात आली होती. पण मुंबईतही त्यापेक्षा वेगळे काहीच घडले नाही. दुर्गम, मागास भागातल्या रुग्णांच्या वाटयाला जे येते, त्याहून वेगळे काही राजधानीच्या शहरामधल्या रुग्णांच्याही वाटयाला येत नसेल तर सध्या सतत सगळयांच्याच कानीकपाळी आदळल्या जाणाऱ्या 'गॅरंटी'चे करायचे तरी काय? सत्तेत आहेत त्यांच्यापेक्षा आम्ही बरे म्हणत सत्तेवर येणाऱ्यांना ज्यांच्याकडून मते हवीत त्या नागरिकांच्या जिवाशी काही देणेघेणे आहे की नाही?

भांडुपमध्ये सुषमा स्वराज पालिका रुग्णालयात बाळंतपणासाठी दाखल झालेल्या महिलेवर उपचार सुरू असताना वीज गेली. त्यामुळे टॉर्चच्या प्रकाशात तिच्यावर उपचार सुरू होते. पण प्रसूतीच्या शस्त्रक्रियेदरम्यान बाळाचा मृत्यू झाला. मग अतिरक्तस्रावामुळे मातेची प्रकृती गंभीर झाली. मग तिला शीव येथील रुग्णालयात हलवण्यात आले. पण तिथे तिचाही मृत्यू झाला.. अशीच करुण कहाणी जळगावमधल्या एखाद्या सरकारी रुग्णालयामधूनही समोर येऊ शकते. चंद्रपूरमध्येही एखाद्या मातेच्या वाटयाला हे दुर्भाग्य येऊ शकते. मराठवाडयामधले शहरी भागामधले किंवा ग्रामीण भागातले एखादे सरकारी रुग्णालयही याला अपवाद नसेल. पुणे, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.. मातामृत्यूंचे प्रमाण कमी झाले असल्याचे सरकारी आकडेवारी सांगत असली तरी राज्याच्या, देशाच्या कानाकोपऱ्यातून कुठूनही अशी उदाहरणे सातत्याने पुढे येत राहतात. मुख्य म्हणजे हे सगळे फक्त बाळंतपणासाठी रुग्णालयात जाणाऱ्या महिलांच्याच वाटयाला येते असे नाही, तर आपले कोणतेही आजारपण घेऊन सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे जाणाऱ्या कुणालाही तिथे आपला जीव मुठीत धरूनच असावे लागते.

पुण्यात मध्यंतरी ससून रुग्णालयात अतिदक्षता विभागात असलेल्या एका रुग्णाचा उंदीर चावल्यामुळे मृत्यू झाला, असा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला होता. अशा पद्धतीने उंदीर चावल्यामुळे मृत्यू होत नाही असे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे असले तरी अतिदक्षता विभागात उंदीर निघणे या मुद्दयाचे काय? याच ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावरून पोलिसांनी दोन कोटींचे अमली पदार्थ जप्त केले होते. शहरांमधल्या पालिका प्रशासनाच्या रुग्णालयांची ही परिस्थिती आणखी खोलात म्हणजे ग्रामीण भागात जावे तसतशी आणखी गंभीर होते जाते. मेळघाटामधले, इतर आदिवासी भागांमधले बालमृत्यू, वारंवार येणाऱ्या बाळंतपणासह वेगवेगळया कारणांमुळे असलेले स्त्रियांचे आरोग्याचे गंभीर प्रश्न, बालकांमधले तीव्र कुपोषण, क्षयरोगाचे प्रमाण, दूषित पाणी, अस्वच्छता, वाढते प्रदूषण या सगळयांमुळे सतत सुरू असलेल्या वेगवेगळया साथींची आव्हाने यांना आपली आरोग्य यंत्रणा कायमच तोंड देत असते. आव्हाने आणि उपाय यांची कायमच हातातोंडाची गाठ असते याला अर्थसंकल्पामधली आरोग्यावरची नेहमीच अपुरी असलेली तरतूद कारणीभूत आहे आणि त्यावर याआधीही कित्येक वेळा चर्चा करून झाली आहे. पण कोणत्याही पक्षाची सरकारे आली तरी या तरतुदीत फारसा फरक पडताना दिसत नाही. त्याचेच प्रतिबिंब सगळया सेवांमध्ये दिसते.

आर्थिक तरतूद पुरेशी नसल्यामुळे पदे भरली जात नाहीत. त्याबरोबरच दर्जाहीन पायाभूत सुविधा, अत्यावश्यक उपकरणे गंजून गेलेली असणे, साधी साधी अत्यावश्यक औषधे न मिळणे, बेपर्वा तसेच गैरहजर कर्मचारी, रुग्णवाहिका उपलब्ध नसणे, अपुऱ्या खाटा, उपचारात होणारी दिरंगाई यामुळे ग्रामीण भागातून उपचारासाठी आलेल्या रुग्णांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागतो. दुर्गम भागात रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे किंवा पोहोचू शकत नसल्यामुळे अनेकदा रुग्णांना खाटांवरून किंवा झोळीत घालून प्राथमिक आरोग्य केंद्रात न्यावे लागते. तिथे डॉक्टर अनेकदा उपलब्ध नसतात. इथे सुरू होतो डॉक्टरांची अपुरी संख्या हा मुद्दा. महागडे वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर अनेक डॉक्टरांना तो खर्च भरून काढण्यासाठी शहरांमध्येच प्रॅक्टिस करायची असते. सरकारी सेवेत असलेले डॉक्टर ग्रामीण भागातील नियुक्तीच्या ठिकाणी खूप कमी काळ असतात ही तर नेहमीची तक्रार आहे. अनेक वैद्यकीय कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नाहीत. तर काही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जुळवून घेत मुख्यालयात किंवा सोयीच्या ठिकाणी प्रतिनियुक्ती घेतात. या सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांना रुग्ण, त्यांच्यावरचे उपचार यापेक्षा औषधे, बांधकाम साहित्य यांची खरेदी यातच अधिक रस असतो. ग्रामीण भागातील अनेक गावांचा संपर्क पावसाळयात तुटतो. रस्ते खराब असतात. रुग्णांना वेळेवर उपचार मिळू शकत नाहीत. न्यायालयाच्या निर्देशानंतरही तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा पुरवण्यात सरकारला

# ...पान १ वरुन...

## शिवसेना आणि धनुष्यबाण...

चार ते पाच लोकांना जेलमध्ये डांबण्याचा उद्धव ठाकरे यांची योजना होती. त्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव होते. याबाबत उद्धव ठाकरे यांनी मला स्वतः सांगितले होते. देवेंद्र, त्यांचा भाऊ आणि पत्नीची प्रकरणे माझ्याकडे आली आहेत. आता देवेंद्र यांना सोडत नाही, त्यांना जेलमध्येच घालतो, असे उद्धव ठाकरे हे मला म्हणाले होते, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्र्यांनी केला. भाजप नेते गिरीश महाजन यांच्यावर मोक्का लावला जाणार होता. त्यावर मी उद्धव ठाकरे यांना सागितले की, असे करणे योग्य नाही. त्यावर ते म्हणाले, मला करायचे आहे, भाजपला घाबरवायचे आहे, त्यांच्या लोकांना जेलमध्ये टाकायचे आणि भाजपचे २० ते २५ आमदार फोडायचे आहेत, असा दावाही मुख्यमंत्र्यांनी केला. त्यांची ही सर्व योजना यशस्वी झाली, तर माझा योजना अयशस्वी झाली असती, असेही ते म्हणाले. काँग्रेस इतकी वर्ष सत्तेत असताना त्यांनी काश्मिरबाबत बोटचेपी धोरण ठेवले. काँग्रेसचे धोरण पाकिस्तान धार्जिणे आहे. यामुळेच 'काँग्रेस का हाथ पाकिस्तान के साथ' अशी टिका मुख्यमंत्र्यांनी केली. तसेच विजय वड्डेटीवारांनी २६/११ हल्ल्यातील शहिद पोलिसांबाबत केलेल्या संतापजनक वक्तव्यावर काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसलेले नकली हिंदुत्ववादी गप्प का, असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. नकली हिंदुत्व, मी हिंदू आहे, मी मर्द आहे असे बोलून कोणी हिंदू होत नाही. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असते तर यांना चांगलेच धुतले असते, असेही ते म्हणाले.

ठाणे लोकसभेची जागा आम्हाला मिळणार नाही, असे सगळ्यांना वाटत होते. पण, मी भाजपच्या वरिष्ठांना सांगितले की, आनंद दिघेंचा ठाणे जिल्हा, शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. ठाण्याबाबत आमच्या वेगळ्या भावना आहेत. आनंद दिघे यांच्या संवेदना आहेत. यामुळेच आम्हाला ठाणे मिळाले, असेही ते म्हणाले.

## नवी मुंबईत नव्या स्मार्ट...

आणण्यासाठी मांजरींची नसबंदी सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. त्यासाठी मांजरींच्या नसबंदीचे केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र नवी मुंबई महापालिकेने अद्याप मांजरींच्या नसबंदी उपक्रमाला सुरुवात केलेली नाही. नजीकच्या पनवेल महापालिका हद्दीत हा उपक्रम कधीच सुरू झाला आहे, मात्र नवी मुंबई महापालिकेला यासाठी अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.

नवी मुंबईत आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे, त्यानुसार या भागासाठी अन्न व औषध प्रशासनाचे स्वतंत्र कार्यालय असावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. येथील पाचही बाजार आवारातील फळे, भाज्या, गहू, तांदूळ, खाद्यपदार्थ यांबाबत अनेक तक्रारी असतात. त्या कुठे कराव्यात, असा प्रश्न सर्वांना पडतो. ठाण्यातील कार्यालयाबाबत सर्वांना माहीत आहे. मात्र नवी मुंबईत अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय नसल्याने अनेकांना तक्रारी करता येत नाहीत. त्यामुळे अन्नपदार्थ, खाद्यपदार्थ यात होणारी भेसळ रोखता येत नाही. याबाबत तक्रार होत नसल्याने, अन्नपदार्थांमधील भेसळीचे प्रकार वारंवार होत असतात. त्यामुळे त्यांच्याबाबत तक्रार करता यावी, यासाठी नवी मुंबईत वाशीसारख्या ठिकाणी स्वतंत्र अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय असावे, अशी मागणी नागरिक करत आहेत.

## अशक्य वाटणारे...

आरपीएफने एप्रिल महिन्यात सामान गहाळ झाल्याची २६ प्रकरणे नोंदवली. या प्रकरणांचा तातडीने तपास करण्यात आला. चोरी गेलेल्या आणि हरवलेल्या वस्तूंपैकी ७ लाख २१ हजार ९१० रुपये किमतीचे सामान संबंधित प्रवाशांना सुपूर्द करण्यात आले.

प्रवाशांनी मौल्यवान वस्तू नेहमी सोबत ठेवणे, बॅग सुरक्षितपणे लॉक करणे आणि सामान दुर्लक्षित सोडणे टाळणे, असे आवाहन रेल्वे सुरक्षा दलाने केले. या सोप्या गोष्टींमुळे रेल्वे प्रवासादरम्यान सामानाचे नुकसान किंवा चोरी रोखण्यासाठी खूप मदत करू शकतात. प्रवासादरम्यान आढळणाऱ्या कोणत्याही संशयास्पद हालचाली किंवा घटनांची तक्रार तातडीने जवळच्या आरपीएफ, जीआरपी कर्मचारी किंवा तिकीट तपासणीसांकडे करावी, असेही आवाहन मध्य रेल्वेचे विभागीय वरिष्ठ सुरक्षा आयुक्त मनोजकुमार यांनी केले.

## कल्याणमधील हरितपट्ट्यावरील...

कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, व्दारली भागात काही जीन्स कारखाना चालकांनी या भागातील सरकारी, खासगी जमिनीवरील हरितपट्टा नष्ट करून, या भागातील जैवविविधतेला धोका निर्माण होईल अशा पध्दतीने ३२ जीन्स कारखान्यांची उभारणी केली होती. लोखंडी निवारे, सिमेंट पत्र्यांचे आडोसे तयार करून त्यामध्ये चोरट्या पध्दतीने महावितरणची वीज वाहिनी घेऊन या जिन्स कारखान्यांची यंत्रणा सुरू करण्यात आली होती. या जीन्स कारखान्यांमधून होणाऱ्या प्रदुषणाविषयी आय प्रभाग साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या.

या तक्रारीप्रमाणे मुंबरकर यांनी चिंचपाडा, व्दारली येथील जीन्स कारखान्यांची पाहणी केली. या कारखाने चालकांनी शासन, पालिका प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे आणि हे कारखाने बेकायदा असल्याचे निष्पन्न झाले. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, परिमंडळ उपायुक्त रमेश मिसाळ यांच्या आदेशावरून पोलीस बंदोबस्तात मानवी आरोग्याला घातक असलेले प्रदुषणकारी ३२ कारखाने आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी तोडकाम पथक, जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केले. या कारखान्यांना चालकांनी महावितरणची चोरून वीज घेतली असल्याचे अनेक ठिकाणी तोडकाम पथकाला दिसले. कारवाई पूर्वी वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता.

हेही वाचा मुख्यमंत्री शिंदे यांचे बालेकिल्ल्यात शक्तिप्रदर्शन; नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी ठाण्यात 'रोड शो कारवाई सुरू होण्यापूर्वीच कारखाने चालक, कामगार घटनास्थळावरून पळून गेले होते. या कारवाईने प्रदुषणाने त्रस्त स्थानिक रहिवासी समाधान व्यक्त करत आहेत.

## सोसायट्यांवर राहणार...

गृहनिर्माण सोसायट्यांना कार्यक्षम एसटीपी प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. सोसायटीत तयार होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते सिंचन, बागकाम, स्वच्छतागृहांसाठी वापरणे आवश्यक आहे.

सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पांच्या उभारणीशिवाय विकासकाला बांधकाम पूर्णत्त्वाचा परवाना दिला जात नाही. मात्र, पुण्यासह पिंपरी-चिंचवडमध्येही अनेक सोसायट्यांनी केवळ कागदावर 'एसटीपी' प्रकल्प दाखवले असून, काही सोसायट्यांचे प्रकल्प बंद अवस्थेत आहेत. काही प्रकल्प नियमित देखभालीअभावी बंद पडले आहेत. परिणामी या पाण्याचा पुनर्वापर तर दूरच, सध्या विनाप्रक्रिया लाखो लिटर पाणी महापालिकेच्या ओढ्यानाल्यांमधून नदीमध्ये मिसळले जात आहे.

'एमपीसीबी पुणे'चे प्रादेशिक अधिकारी रवींद्र आंधळे म्हणाले, की 'बांधकाम सुरू करण्यापूर्वी विकासकांना स्थापनेची संमती दिली जाते. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ऑपरेट करण्याची संमती घ्यावी लागते. मात्र, एखादी सोसायटी विकासकाच्या ताब्यात गेल्यानंतर सर्वच सोसायट्या एसटीपी ठेवत नाहीत किंवा ते कार्यरत नसतात. काही सोसायट्यांमध्ये आजही पिण्याच्या पाण्याचा वापर घरगुती कामे आणि स्वच्छतागृहांमध्ये केला जातो. आतापर्यंत अशा सोसायट्यांवर कारवाई झाली नाही.' 'सोसायट्यांमध्ये कार्यक्षम एसीटीपी आहेत का, प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर कशासाठी केला जातो, याची माहिती घेण्यास महापालिकांना बजावले आहे. संबंधित सोसायट्यांवर कारवाईचे अधिकार महापालिकेला नाहीत. मात्र, नियमानुसार आम्ही अशा सोसायट्यांना नोटिसा बजावून पुढच्या टप्प्यात त्यांचा पाणीपुरवठा थांबविण्याचे; तसेच गरजेनुसार सोसायटीवर खटलाही चालविण्याचे अधिकार आम्हाला आहेत,' असेही आंधळे यांनी स्पष्ट केले.

## कोळीवाडे आणि...

मागणी करण्यात आली आहे. मुंबईचा विकास आराखडा तयार होऊन दहा वर्षे झाली तरी अद्याप कोळीवाड्यांसाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली आलेली नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत चटईक्षेत्रफळ निर्देशांक ४ पर्यंत दिला जातो. तोच कोळीवाड्यांमध्ये जेमतेम दीड एफएसआय दिला जातो. त्यामुळे येथील घरांचा पुनर्विकास होऊ शकत नाही. गावठाणांच्या विकासासाठीचा निधी झोपडपट्ट्यांमध्ये वापरला जातो, असाही आरोप पिमेंटा यांनी केला आहे.

पाचशे चौरस फुटांपर्यंतच्या घरांना जशी मालमत्ता करातून सवलत दिली आहे. तशीच कोळीवाड्यामधील निवासी बांधकामांनाही मालमत्ता कर माफ करावा अशी मागणी या जाहीरनाम्यातून करण्यात आली आहे. गावठाणामध्ये पाणी पुरवठा, मलनिस्सारण वाहिन्या, पर्जन्यजलवाहिन्या अशा मूलभूत सुविधा द्याव्यात अशीही मागणी करण्यात आली.

## बहुजन विकास आघाडीला...

उमेदवारांना चिन्हाचे वाटप करण्यात आले आणि बहुजन विकास आघाडीला शिट्टी चिन्ह मिळाले. यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पसरला आहे. शिट्टी चिन्हामुळे आमचा विजय आता अधिक सोपा झाला आहे. कार्यकर्ते उत्साहात आणि जोमाने कामाला लागले आहेत, अशी प्रतिक्रिया पक्षाचे संघटक सचिव अजीव पाटील यांनी दिली. पालघर जिल्ह्यात आमची ओळख शिटीवाले अशी होती. काही लोकांना यंदाही डमी अर्ज भरून शिट्टी चिन्ह पळविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. मात्र आम्ही कायदेशीर मार्गाने आमचे चिन्ह परत मिळवले आहे, असेही पाटील म्हणाले.

मागील निवडणुकीत बविआला ४ लाख ९१ हजार मते मिळाली होती. यंदा या मतांमध्ये वाढ होईल असा विश्वास अजीव पाटील यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीचे घटक पक्ष यंदा सोबत नसले तरी जिल्ह्यात कामे केलेली आहे. राजेश पाटील यांनी आमदारकीच्या काळात जिल्हा पिंजून काढला आणि विकासकामे केली. त्याचा फायदा होणार असून मागील वेळेपेक्षा जास्त मते मिळवून आमचा विजय होईल, असे ते म्हणाले.

## कल्याण शिळफाटा...

करून येथील वाहनचालकांना दिलासा देण्यात आला होता. तर या मार्गावरील प्रवास अधिक वेगवान होण्यासाठी या मार्गावरील पुढील टप्पा असलेल्या मुंब्रा परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील शिळफाटा जंक्शन येथे सहा पदरी उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे.

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी एमएमआरडीच्या माध्यमातून या पुलाची उभारणी केली आहे. या उड्डाणपुलाची तीन मार्गिका असलेली एक बाजू फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकार्पण करून सुरु केली होती. यामुळे पनवेल कडे जाणाऱ्या वाहतूकदारांना मोठा दिलासा मिळाला होता. तर या पुलाची तीन मार्गिका असलेली दुसरी बाजू देखील नुकतीच वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. यामुळे बदलापूर ते डोंबिवली येथून कल्याण शीळ मार्गे ठाणे आणि नवी मुंबई प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून मुक्तता मिळणार असून वेगवान प्रवास करता येणार आहे. यामुळे वाहन चालकांच्या वेळेमध्ये आणि इंधनाचीही बचत होणार आहे.

## 'टेप रेकॉर्डरसारखे काम...

त्यामुळे न्यायाच्या हितासाठी न्यायाधीशांनी कार्यवाहीवर लक्ष ठेवले पाहिजे. तसेच सरकारी वकील जर एखाद्या प्रकरणासंदर्भात गाफील असतील तर न्यायालयाने कार्यवाहीवर प्रभावीपणे लक्ष ठेवले पाहिजे. असे केल्यास त्या प्रकरणाच्या सत्यापर्यंत पोहोचता येईल', असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

फौजदारी न्याय व्यवस्थेचा पाया म्हणून सार्वजनिक अभियोग सेवा आणि न्यायपालिका यांच्यातील संबंधांचे वर्णन करताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सरकारी वकीलांच्या नियुक्तीमध्ये राजकीय विचाराचा घटक असता कामा नये. दरम्यान, १९९५ मध्ये पत्नीच्या हत्येप्रकरणी एका पुरुषाला दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली, या प्रकरणाचा निकाल देताना वरील निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. यावेळी या खंडपीठात न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचाही समावेश होता. दरम्यान, शुक्रवारी दिलेल्या निकालात खंडपीठाने म्हटले, सत्यापर्यंत पोहोचणे आणि तसेच न्याय देणे हे न्यायालयाचे कर्तव्यच आहे. त्यामुळे न्यायालयांना सुनावणीमध्ये सहभागाची भूमिका बजवावी लागेल. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यासाठी फक्त टेप रेकॉर्डर म्हणून काम करू नये. न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी सुनावणीत सक्रीय सहभाग घेणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक वाटणारी सर्व माहिती साक्षीदारांकडून घेणे हे अपेक्षित आहे, असे निरीक्षण नोंदवले. याबरोबरच सरकारी वकिलांसारख्या पदावर नियुक्ती करत असताना त्या व्यक्तीच्या योग्यतेकडे लक्ष दिले पाहिजे, असेही न्यायालयाने म्हटले.

## वाढवण बंदराची...

अवलंबता संपुष्टात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पालघर परिसराचा विकास

-बंदर उभारणीला केंद्र सरकारची परवानगी मिळाल्यानंतर याच परिसरात अद्ययावत रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरच्या उभारणी होणार आहे.

-न्हावाशेवाच्या तुलनेत वाढवण येथे ४३ टक्के जागा उपलब्ध असल्याने जागेचा प्रभावी वापर करण्यासाठी बंदर प्रकल्प आखणी करण्यात आली आहे.

-निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर पालघर, डहाणू तालुक्यातील स्थानिकांसाठी कौशल्य प्रशिक्षणाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

-प्राधिकरणाच्या आवारात माफक दरात मध्यवर्ती पार्किंग वाहनतळ उभारणी झाली असून वाहन चालकांसाठी विनामूल्य आरोग्य सेवा व माफक दरात भोजनाची व्यवस्था सुरू आहे.

-परिसरातील गावांमध्ये उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा व सामाजिक दायित्व विभागातर्फे विकास योजना राबवण्याचे उपक्रम सुरू आहेत.

-जेएनपीएकडून प्राप्त झालेली अनुभवाची शिदोरी घेऊन वाढवण येथे मानवी चेहऱ्यासह विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून या विकासात कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देण्यात येणार आहे.

पाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था वाढवण येथील प्रस्तावित बंदराच्या ठिकाणी व नियोजित कर्मचारी वसाहतीसाठी आरंभी दोन दशलक्ष लिटर प्रतिदिन व नंतर सुमारे सहा दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता भासणार आहे. अस्तित्वात असणाऱ्या पाटबंधारे प्रकल्पात किंवा समुद्रात वाया जाणाऱ्या पाण्याची साठवणूक करण्यासाठी नव्याने व्यवस्था आखण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च जेएनपीए उचलणार आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor : Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# सई गाजवणार बॉलिवूडवर अधिराज्य; दिसणार बड्या कलाकारांसोबत!



सई ताम्हणकरने काही दिवसापूर्वी एक्सेल एंटरटेनमेंट सोबत दोन नव्या प्रोजेक्ट्स ची घोषणा केली होती. 2024 हे वर्ष सई साठी बॉलिवूडमय ठरतंय यात शंका नाही. 'भक्षक' या हिंदी वेब शो नंतर आता सई 'अग्नी ' साठी सज्ज होत आहे. 2024 मध्ये सई बॉलिवूड मध्ये दमदार काम करताना दिसतेय आणि आगामी काळात ती अजून उत्कंठावर्धक प्रोजेक्ट्स करणार यात शंका नाही.

आंतरराष्ट्रीय फायर फायटर दिवशी सईने 'अग्नी' च पोस्टर शेयर केलं आहे. प्रतीक गांधी , जितेंद्र जोशी , दिवेंधू , सयामी खेर अशी तगडी स्टाकास्ट असलेला 'अग्नी ' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सईच्या अभिनयाचे आजही अनेक चाहते आहेत. त्याचप्रमाणे तिच्या प्रोजक्ट्सची देखील अनेकजण आतुरतेने वाट पाहत असतात. त्यातच पुन्हा एकदा सईने तिच्या चाहत्यांना गुडन्यूज दिली असल्याचं पाहायला मिळतंय. त्यामुळे या सिनेमात सई कोणत्या भूमिकेत दिसणार याची देखील उत्सुकता अनेकांना लागून राहिली आहे.

प्रतीक गांधी या बड्या कलाकारांसोबत सई या आगामी अग्नी मध्ये दिसणार असून तिच्यासाठी हा प्रोजेक्ट खास आहे असल्याची भावना सईने व्यक्त केल्या आहेत.एक्सेल एंटरटेनमेंटसोबत पुन्हा काम करण्याची संधी तिला मिळाली असून या प्रोजेक्ट बद्दल सई म्हणते, 'एक्सेल एंटरटेनमेंट सारख्या प्रोडक्शन हाऊस सोबत काम करण्याची संधी मला मिळाली याचा खूप आनंद आहे.

**अग्नी हा प्रोजेक्ट्स नक्कीच माझ्यासाठी खूप खास आहे. एवढ्या बड्या स्टार्स सोबत काम करण्याचा अनुभव खूप कमालीचा होता. आज आंतरराष्ट्रीय फायर फायटर दिवशी अग्नी चित्रपटाचं पोस्टर शेयर करताना आम्हाला खूप आनंद होतोय. हा चित्रपट खूप वेगळा असणार असून तो नक्कीच प्रेक्षकांना एक वेगळा संदेश देऊन जाणार आहे. 'ग्राउंड झिरो' आणि 'अग्नी' या व्यतिरिक्त सई 'डब्बा कार्टेल' मध्ये सुद्धा दिसणार आहे. या वर्षाच्या शेवटी नेटफ्लिक्सवर डब्बा कार्टेल रिलीज होणार असून एक्सेल एंटरटेनमेंटसोबत सईचा हा तिसरा प्रोजेक्ट असणार आहे. या चित्रपटात शबाना आझमी, ज्योतिका शालिनी पांडे, निमिषा सजयन, अंजली आनंद, गजराज राव आणि जिशु सेनगुप्ता यांसारख्या दिग्गज कलाकारांचा समावेश आहे. एकंदरीत कामाचं सातत्य जपत सई बॉलिवूडवर अधिराज्य गाजवणार यात शंका नाही. 2024 मध्ये सईच्या बॉलिवुड प्रोजेक्ट्सची लाईन खूप मोठी आहे आणि हे बघण आता उत्सुकतेच ठरतंय.**

# अभिनेता श्रेयस तळपदेच्या हृदयविकाराच्या झटक्याचा कोविड लसीशी संबंध?




अभिनेता श्रेयस तळपदेने काही महिन्यांपूर्वी त्याच्या आयुष्यातला सगळ्यात कठिण प्रसंग अनुभवला होता. काही महिन्यांपूर्वी श्रेयसला हृदयविकाराचा झटका आला त्यानंतर श्रेयससाठी प्रत्येक ठिकाणी प्रार्थना होऊ लागली. तो काळ आणि त्यावेळी काय घडलं होतं, यावर श्रेयसने अनेकदा भाष्य केलंच आहे.

काही महिन्यांपूर्वी श्रेयसला हृदयविकाराचा झटका आला त्यानंतर श्रेयससाठी प्रत्येक ठिकाणी प्रार्थना होऊ लागली. तो काळ आणि त्यावेळी काय घडलं होतं, यावर श्रेयसने अनेकदा भाष्य केलंच आहे. ॲस्ट्राझेनेका (AstraZeneca) कंपनीच्या खुलाशानंतर कोरोनाची लस घेणाऱ्या लोकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ॲस्ट्राझेनेकाने कंपनीने न्यायालयात कबूल केले आहे की, कोविशिल्डमुळे थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोम (TTS) म्हणजेच थ्रोम्बोसिस होऊ शकते.

यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होतात आणि प्लेटलेटची संख्या कमी होते. थ्रोम्बोसाइटोपेनियाच्या गंभीर प्रकरणांमध्ये, यामुळे ब्रेन स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका देखील येऊ शकतो. त्यातच आता श्रेयसने देखील त्याच्या हृदयविकाराच्या झटक्याविषयी सविस्तर भाष्य केलं आहे.

यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होतात आणि प्लेटलेटची संख्या कमी होते. थ्रोम्बोसाइटोपेनियाच्या गंभीर प्रकरणांमध्ये, यामुळे ब्रेन स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका देखील येऊ शकतो. त्यातच आता श्रेयसने देखील त्याच्या हृदयविकाराच्या झटक्याविषयी सविस्तर भाष्य केलं आहे. आपण हल्ली असे अनेक किस्से ऐकतो, कि आता चांगला होता आणि अचानक असं काहीतरी झालं. मग या सगळ्याला काय कारण असू शकतं. मी धुम्रपान करत नाही, मी दररोज दारु पीत नाही, तंबाखू वैगरे मला व्यसन नाही. होय माझं कलेस्ट्रोल नक्कीच जास्त होतं, पण मला सांगितलं होतं की हे नॉर्मल आहे. त्यासाठीही मी औषधं घेत होतो. मला डाएबिटीज नाही, बीपी नाही मग दुसरं कारण काय असू शकतं. मला खायलाही खूप आवडतं, पण म्हणून मी जास्त बाहेरचंही खात नाही. जेवढी काळजी घेता येईल तेवढी घेत होतो.

# यादीत भारताचा एकही खेळाडू नाही, युएई अन पाकिस्तानचे क्रिकेटर आघाडीवर



आंतरराष्ट्रीय क्रिकेट काऊन्सीलने आज एप्रिल महिन्याचे आयसीसी मेन्स प्लेअर ऑफ द मंथच्या नॉमिनेटेड खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. या यादीत युएई, नामीबिया आणि पाकिस्तान या संघाच्या खेळाडूंचा समावेश आहे. या यादीत एकाही भारतीय खेळाडूचा समावेश आहे.

ही काही मोठी गोष्ट नाही कारण भारतीय खेळाडू हे आयपीएल खेळत आहेत. या काळात भारताने एकही आंतरराष्ट्रीय मालिका खेळलेली नाही. त्यामुळेच या यादीत भारतीय संघातील एकाही खेळाडूचा समावेश नाही.

गेरहार्ड इरासमस (नामीबिया)

आयसीसी मेन्स प्लेअर ऑफ द मंथसाठीच्या खेळाडूंच्या यादीत पहिलं नाव हे नामीबियाचा खेळाडू गेरहार्ड अरासमसचे आहे. गेरहार्ड हा नामीबियाचा कर्णधार देखील आहे. एप्रिल महिन्यात गेरहार्डने दमदार कामगिरी केली होती. त्याने टी 20 मालिकेत गोलंदाजी आणि फलंदाजीत देखील दमदार कामगिरी केली. या मालिकेत तो प्लेअर ऑफ द मॅच देखील झाला होता.

मोहम्मद वसीम (युएई)

युएईचा खेळाडू मोहम्मद वसीम एप्रिल महिन्याच्या सुरूवातीला फार काही चांगली कामगिरी करू शकला नव्हता. मात्र त्याने आपला फॉर्म परत मिळवत कुवैत विरूद्धच्या मालिकेत वसीमने तीन सामन्यात 65,48 आणि 45 अशा धावा केल्या. त्याचबरोबर एसीसी प्रीमियर कपच्या अंतिम सामन्यात वसीमने दमदार शतक देखील ठोकलं होतं.

शाहीन आफ्रिदी (पाकिस्तान)

पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीने न्यूझीलंडविरूद्धच्या टी 20 मालिकेत दमदार कामगिरी केली. शाहीन हा या मालिकेत पाकिस्तानकडून सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. मालिकेतील दुसऱ्या सामन्यात शाहीनच्या भेदक माऱ्यामुळं पाकिस्ताननं न्यूझीलंडला 90 धावात गुंडाळलं. या सामन्यात आफ्रिदीने 13 धावा देत 3 विकेट्स घेतल्या होत्या. पाकिस्तान आणि न्यूझीलंडची मालिका 2-2 अशी बरोबरीत सुटली.

# भारतीय महिला अन पुरुष संघाची रिलेमध्ये दमदार कामगिरी, आता ऑलिम्पिक पदकासाठी पॅरिसमध्ये धावणार



भारतीय महिला आणि पुरुष रिले संघ 4x400 मीटर रिलेमध्ये पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहेत. बहामास येथे सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स रिलेमध्ये सोमवारी भारतीय महिला संघाने दुसऱ्या फेरीतील हीटमध्ये दुसरे स्थान पटकावले. तर पुरुष संघानेही दुसऱ्या हीटमध्ये दुसरे स्थान मिळवून पात्रता मिळवली.

रुपल चौधरी, एम आर पूवम्मा, ज्योतिका श्री दांडी आणि सुभा वेंकटेशन यांनी तीन मिनिटे आणि 29.35 सेकंदात जमैका (3:28.54) च्या मागे हीट नंबर वनमध्ये दुसरे स्थान पटकावले. तत्पूर्वी, भारतीय संघाने रविवारी पहिल्या फेरीच्या पात्रता फेरीत तीन मिनिटे आणि 29.74 सेकंद वेळेसह पाचवे स्थान पटकावले होते.

पुरुष संघाने पटकावला दुसरा क्रमांक

मोहम्मद अनस याहिया, मोहम्मद अजमल, अरोकिया राजीव आणि अमोज जेकब यांच्या पुरुष संघाने 3:3.23 सेकंदांची वेळ नोंदवत अमेरिकेच्या (2:59.95) मागे दुसरे स्थान पटकावले. दुसऱ्या फेरीतील तीन हीटमधील अव्वल दोन संघ पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरतील अशी माहिती आहे. पॅरिस ऑलिम्पिक यावर्षी 26 जुलै ते 11 ऑगस्ट दरम्यान होणार आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताकडे 19 ट्रॅक आणि फील्ड ॲथलीट आहेत, ज्यात टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा देखील आहे. पॅरिस ऑलिम्पिकमधील ॲथलेटिक्स स्पर्धा 1 ऑगस्टपासून सुरू होणार आहेत.

## दैनिक राशी भविष्य

**मेष** – ज्येष्ठांनी त्यांच्या जास्तीच्या ऊर्जेचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करून त्याचा चांगला लाभ घ्यावा. कार्य क्षेत्रात किंवा व्यवसायात तुमचा निष्काळजीपणा आज तुम्हाला आर्थिक नुकसान देऊ शकतो.

**वृषभ** - चार भिंती बाहेरील खेळांचे तुम्हाला आकर्षित करतील. ध्यानधारणा आणि योगाचा तुम्हाला फायदा होईल. आर्थिक पक्ष मजबूत होण्याची पूर्ण शक्यता आहे.

मिथुन - सामाजिक आयुष्यापेक्षा आरोग्याला प्राथमिकता द्यावी लागेल. आज अनुभवी आणि नावीन्यपूर्ण कल्पना असलेल्या लोकांच्या सल्ल्यानुसार पैसे गुंतवा. आज यशाचे हेच समीकरण उपयोगी ठरेल.

**कर्क** – इतरांबरोबर आनंद वाटून घेण्याने आपले आरोग्य बहरून जाईल. आज केवळ बसून राहण्यापेक्षा - काहीतरी असे करा ज्यामुळे तुमची मिळकत क्षमता वाढू शकेल.

**सिंह** – निसर्गाने आपल्याला लक्षणीय असा आत्मविश्वास आणि बुद्धिमत्तेचे दान दिले आहे, त्याचा उत्तम वापर करा. कार्य क्षेत्रात किंवा व्यवसायात तुमचा निष्काळजीपणा आज तुम्हाला आर्थिक नुकसान देऊ शकतो.

**कन्या** – आनंदाने खुशीने परिपूर्ण असा चांगला दिवस. ज्या लोकांची अजून सॅलरी आलेली नाही आज ते पैश्याला घेऊन खूप चिंतीत राहू शकतात आणि आपल्या मित्राकडून उधार मागू शकतात. घरातील आयुष्य शांततापूर्ण आणि मोहक असेल.

**तुळ** – तुमच्या चिडण्यामुळे तुम्ही राईचा पर्वत कराल - त्यामुळे तुमच्या कुटुंबातील सदस्य अस्वस्थ होतील. बुद्धिमत्तेच्या जोरावर आपला राग नियंत्रणात ठेवणारे भाग्यवान आत्मे असतात. तुम्ही तुमच्या राग जाळून टाका नाहीतर राग तुम्हाला जाळून भस्मसात करेल.

**वृश्चिक** – उत्स्फूर्तपणे वागण्यावर नियंत्रण ठेवा आणि दुराग्रही स्वभावावर नियंत्रण ठेवा. खासकरून पार्टीमध्ये त्यामुळे एखाद्याचा मूड खराब होईल. ही गोष्ट लक्षात घ्या की, दुःखाच्या प्रसंगात तुमचे संचित धनच तुमच्या कामी येईल म्हणून, आजच्या दिवशी धन संचय करण्याचा विचार बनवा. घरातील कामं पुरी करण्यासाठी मुलं तुम्हाला मदत करतील. पवित्र आणि खऱ्या प्रेमाचा अनुभव येईल.

**धनु** – तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल. सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल.


**मकर** – असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. आजच्या दिवशी आपल्या खर्चावर नियंत्रण मिळवा, चैनीसाठी पैशांची उधळपट्टी होणार नाही याची काळजी घ्या.

**कुंभ** – उत्तम विनोदबुद्धी ही तुमची मालमत्ता आहे आणि ती वापरून तुम्ही तुमचा आजार बरा करा. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ.

**मीन** – तुम्हाला एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची इच्छा होईल. त्यासाठी तुम्ही धार्मिक स्थळी जाऊन ज्ञानी-योगी-दैवी व्यक्तीला भेटून त्यांच्यादजवळून ज्ञान मिळवाल, आशीर्वाद मिळवाल. धन तुमच्यासाठी गरजेचे आहे परंतु, धनला घेऊन इतके गंभीर होऊ नका की, आपल्या नात्यालाच खराब कराल.

# जीवनशैली बदला, आजार राहतील दूर!

## तरुणच नाही तर लहान मुलंही ठरतायत बळी, अशी काळजी घ्या



**जीवनशैलीचे आजार म्हणजे काय?**

खराब जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे होणाऱ्या आजारांना जीवनशैलीचे आजार म्हणतात. हे रोग संसर्गाने पसरत नाहीत मात्र अनुवांशिक घटक त्यात मोठी भूमिका बजावू शकतात. शारीरिक हालचालींचा अभाव, वाढता ताणतणाव, निद्रानाश, जंक फूडचे सेवन आणि गॅजेट्सचा वाढता कल यामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांची प्रकरणे सातत्याने वाढत आहेत. पूर्वी हे आजार मोठ्यांचे आजार मानले जात होते, परंतु आता ते केवळ तरुणांनाच नाही तर लहान मुलांनाही आपला बळी बनवत आहेत. मात्र शिस्तबद्ध जीवनशैलीतून ते टाळता येतात, पण तुमच्या खराब जीवनशैलीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे तुम्ही त्यांना बळी पडत असाल, तर तुमच्या जीवनशैलीत बदल करून त्यावर नियंत्रणही ठेवता येते.

**खराब जीवनशैलीपासून होणारे आजार**

हृदयरोग

हृदयाच्या स्नायू आणि रक्तवाहिन्यांच्या भिंतीवर परिणाम करणारी कोणत्याही विकृतीला हृदयरोग म्हणू शकतो. धुम्रपान, मधुमेह आणि उच्च कोलेस्टेरॉलमुळे याचा धोका वाढतो. हृदयविकाराने ग्रस्त असलेल्या लोकांमध्ये भारताचा जगात पहिला क्रमांक लागतो. देशातील 5 कोटी लोक हृदयविकाराने त्रस्त आहेत. यातून मृत्युमुखी पडलेल्या लोकांपैकी 30-40 टक्के लोक हे 34 ते 64 वयोगटातील आहेत.

**सुरूवातीची लक्षणे**

छातीत अस्वस्थता आणि जडपणाची भावना.
छातीत दुखणे सह श्वास लागणे.
भरपूर घाम येणे.
सतत चक्कर येणे, थकवा किंवा अशक्तपणा.

**लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने होणारे परिणाम**

एकदा हृदय आजारी पडल्यानंतर, त्याचे कार्य सतत बिघडते आणि आपल्या शरीराला आवश्यक तेवढे रक्त पंप करण्यास सक्षम नसते. अशी परिस्थिती येते जेव्हा ते जवळजवळ कार्य करणे थांबवते. जेव्हा हृदय पूर्णपणे खराब होते, तेव्हा त्याचे प्रत्यारोपण करणे हा एकच पर्याय असतो, परंतु सर्वात मोठी समस्या म्हणजे हृदय मिळणे अत्यंत कठीण असते.

**उपाय**

रक्तदाब नियंत्रणात ठेवा.
तुमचे वजन सरासरी ठेवा.
संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.
तुमच्या जेवणात मीठाचे प्रमाण कमी करा.
धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन थांबवा.
ताण घेऊ नका.

**टाइप 2 मधुमेह**

जेव्हा स्वादुपिंड पुरेसे इंसुलिन तयार करू शकत नाही किंवा जेव्हा शरीर प्रभावीपणे इन्सुलिन तयार करू शकत नाही तेव्हा मधुमेह होतो. इन्सुलिन हे रक्तातील साखर नियंत्रित करणारे हार्मोन आहे. अनियंत्रित मधुमेहामुळे रक्तातील साखरेची पातळी लक्षणीय वाढते, याला हायपरग्लायसेमिया म्हणतात.

**सुरूवातीची लक्षणं**

जास्त तहान लागते.
वारंवार मूत्रविसर्जन
जलद वजन कमी होणे किंवा वाढणे.
जेवूनही भूक लागते.
थकवा जाणवणे.

**लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने होणारे परिणाम**

मधुमेहाची सर्वात गंभीर गोष्ट म्हणजे हा आजार नसून मेटाबॉलिक सिंड्रोम आहे, जो अनेक रोगांचे घर आहे. शरीराच्या प्रत्येक अवयवावर याचा परिणाम होतो. वेळीच निदान न झाल्यास आणि त्यावर नियंत्रण न ठेवल्यास किडनी निकामी होणे, मेंदूचा झटका, रेटिनोपॅथी, हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो.

**उपाय**

मधुमेह हा एक असाध्य जीवनशैलीचा आजार आहे. त्याचे निदान पूर्णपणे केले जाऊ शकत नाही

आहारावर नियंत्रण, नियमित व्यायाम आणि योग्य औषधे घेतल्याने यावर नियंत्रण ठेवता येते.

दररोज एकाच वेळी अन्न खा. दिवसातून तीन वेळा मेगा मील खाण्याऐवजी सहा वेळा मिनी मील खा. हे रक्तातील साखरेच्या पातळीत जास्त चढ-उतार टाळेल.

**उच्च रक्तदाब**

उच्च रक्तदाब किंवा उच्च रक्तदाबामध्ये, रक्तवाहिन्यांमधील रक्तदाब वाढतो, ज्यामुळे हृदयाला रक्तवाहिन्यांमध्ये रक्त परिसंचरण करण्यासाठी सामान्यपेक्षा जास्त मेहनत करावी लागते. हृदय जितके जास्त रक्त पंप करते आणि धमन्या अरुंद होतात, तितका रक्तदाब वाढतो. एका सर्वेक्षणानुसार, भारतातील महानगरांमधील सुमारे 25 टक्के लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. ताणतणाव, लठ्ठपणा, चुकीच्या खाण्याच्या सवयी हे उच्च रक्तदाबाचे मुख्य जोखीम घटक मानले जातात.

**सुरूवातीची लक्षणं**

तीव्र डोकेदुखी.
डोक्यात जडपणा.
अशक्तपणा जाणवतो.
चिडचिड.
निद्रानाश.

**लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने होणारे परिणाम**

उच्च रक्तदाबावर कायमस्वरूपी उपचार करणे शक्य नाही, परंतु तो नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. रक्तदाब वाढल्याने हृदयविकाराचा झटका, ब्रेन स्ट्रोक, किडनी आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

## दिनविशेष

**घटना**

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.
१९९८: मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.
१९९२: एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.
१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.
१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.
१९५५: एअर इंडिया ची मुंबई - टोकियो विमानसेवा सुरू झाली.
१९४६: सोनी कंपनी ची स्थापना झाली.
१९०७: मुंबईत विजेवर चालणारी ट्रॅम सुरू झाली.
१८४९: जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.

**जन्म**

१९६७: राम नरेश रावत - भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधनः ४ सप्टेंबर २०२२)
१९४९: गोपाल निमाजी वाहनवती - भारतीय वकील आणि राजकारणी (निधनः २ सप्टेंबर २०१४)
१९४८: नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक
१९३२: राज मोहन वोहरा - लेफ्टनंट जनरल - महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन : १४ जून २०२०)
१९२३: आत्माराम गोविंद भेंडे - मराठी नाट्यअभिनेते व दिग्दर्शक
१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार - ज्ञानपीठ पुरस्कार (निधनः ६ एप्रिल १९८९)
१९०९: एडविन एच लँड - पोलराईड कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक (निधनः १ मार्च १९९१)
१८९२: जोसेफ टिटो - युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (निधनः ४ मे १९८०)
१८८०: पांडुरंग वामन काणे - भारतीय भारतशास्त्रज्ञ आणि संस्कृत विद्वान - भारतरत्न ( निधन : १८ एप्रिल १९७२)
१८६१: रबिन्द्रनाथ टागोर - भारतीय कवी, पहिले भारतीय नोबेल पुरस्कार विजेते - नोबेल पुरस्कार (निधनः ७ ऑगस्ट १९४१)

**निधन**

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार
२००२: दुर्गाबाई भागवत- जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्मः १० फेब्रुवारी १९१०) २००१: विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्मः १८ मार्च १९०५)
२००१: प्रेम धवन - भारतीय गीतकार - पद्मश्री (जन्मः १३ जून १९२३)
१९९८: ॲलन मॅक्लिओड कॉर्नेक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्मः २३ फेब्रुवारी १९२४)
१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्मः ११ नोव्हेंबर १९११)
१९९१: मनमोहन नातू - लोककवी गोपाळ नरहर तथा (जन्मः ११ नोव्हेंबर १९११)
१९८७: पॉल पोफम - अमेरिकन सैनिक आणि कार्यकर्ता, गे मेन्स हेल्थ क्रायसिसचे सहसंस्थापक (जन्मः ६ ऑक्टोबर १९४१)
१९२४: अलारी सीताराम राजू - भारतीय कार्यकर्ते (जन्मः ४ जुलै १८९७)

निवडणुक कार्यालयात नियुक्त असणाऱ्या नियमित शिक्षकांना


# उन्हाळ्याची सुट्टी जाहीर करण्याची मागणी

घाटकोपर - शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी निवडणूक कार्यालयात बी एल ओ पदावर कार्यरत आहेत. यावेळी नियमित शिक्षकांना सुद्धा निवडणुक ड्युटी देण्यात आली आहे. राज्यातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक 2 मे 2024 पासून ते दिनांक 14 जून 2824 पर्यंत उन्हाळयाची सुट्टी शासनाने जाहीर केली आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांना सदरहू उन्हाळ्याची सुट्टी असणार असल्याची माहिती उत्तर मुंबई अध्यक्ष अरुण सूर्यवंशी यांनी यावेळी दिली.

विदयार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाल्याने अनेक शिक्षक आपल्या निवडणूक कार्यालयात बी.एल.ओ. तसेच इतर कार्यालयीन पदावर कामकाज करीत आहेत. आपण वेळोवेळी दिलेली जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आमचे अतिरिक्त शिक्षक बांधव पार पाडीत आहेत. मे महिन्याच्या काळात शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्ट्या असल्याने अनेक शिक्षक आपल्या कुटुंबियांसोबत मूळगावी जात असतात. काही कौटुंबिक कार्यक्रमांचे नियोजन ही याच सुट्टीच्या कालावधीत केले जाते.

शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांना उन्हाळयाची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मात्र निवडणूक कार्यालयात बी एल ओ आणि इतर पदांवर कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना लोकसभा निवडणुका असल्याने निवडणूक कार्यालयाने उन्हाळयाची सुट्टी जाहीर करुन कार्यमुक्त केले नाही याची जाणीव असल्याचे संघटनेचे सह प्रसिद्धी प्रमुख साईनाथ शेलार यांनी सांगितले. मात्र लोकसभा संपल्यानंतर तरी शिक्षकांना उन्हाळी सुट्टी जाहीर करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# आरक्षण हटविण्याचा पंतप्रधानांचा प्रयत्न



## राहुल गांधी यांचा आरोप

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आरक्षणाविरोधात आहेत. त्यांना आरक्षण हटवायचे आहे, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निर्मल येथील प्रचारसभेत केला. अदिलाबाद लोकसभा मतदारसंघात हा भाग येतो.

लोकसभा निवडणूक ही दोन विचारधारांमधील लढाई असल्याचा दावा राहुल यांनी केला. घटनेचे संरक्षण करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे तर दुसरीकडे जनतेचे हक्क संपुष्टात आणण्याचा भाजप-संघाचा डाव आहे, असा आरोप राहुल यांनी केला. ५० टक्क्यांवरून आरक्षणाची मर्यादा वाढविणे हा देशापुढील मोठा मुद्दा आहे. काँग्रेसने याबाबत जाहीरनाम्यात आश्वासन दिल्याचे राहुल यांनी स्पष्ट केले.

सरकारी कार्यालये तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कंत्राटी पद्धत आम्ही रद्द करू असे आश्वासन राहुल यांनी दिले. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा आम्ही हटवू असे पंतप्रधानांनी एकाही भाषणात म्हटले नाही असा दावा राहुल यांनी केला.

### रायबरेली, अमेठीत प्रचाराची सूत्रे प्रियंकांकडे

■ अमेठी व रायबरेली या उत्तर प्रदेशातील दोन्ही मतदारसंघात काँग्रेसच्या प्रचाराची धुरा प्रियंका गांधी यांच्याकडे असेल. रायबरेलीतून राहुल गांधी तर अमेठीतून किशोरीलाल शर्मा हे उमेदवार आहेत. निवडणूक संपेपर्यंत प्रियंका या तेथेच थांबतील असे सूत्रांनी स्पष्ट केले. राहुल गांधी हे देशभर प्रचारात व्यग्र असल्याने गांधी कुटुंबाच्या या दोन्ही पारंपरिक मतदारसंघांत पक्षाची सारी भिस्त प्रियंकांवर असेल. या दोन्ही मतदारसंघांत २० मे रोजी मतदान आहे.

# भारतमातेची सेवा केली पाहिजे- निलिमा दीदी

मुंबई : जहाँ डाल डाल पर सोने कि चिडीया करती है बसेरा वो भारत देश है मेरा या गाण्याच्या ओळी गाताना आपण भारतमातेची सेवा केली पाहिजेत असे ठोस प्रतिपादन प्रजापिता ब्रम्हाकुमारीज विश्वविद्यालयाच्या विक्रोळी कन्नमवार नगरातील शांतीवनच्या सर्वेसर्वा निलिमादिदि यांनी केले

शांतीवन येथील गार्डन मध्ये जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्यदिनी विभागातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.त्याप्रसंगी निलिमा दिदि बोलत होत्या.

याप्रसंगी ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक व मुक्त पत्रकार कृष्णा काजरोळकर, ज्येष्ठ पत्रकार व डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, महाराष्ट्र शासन प्राप्त नासिकेत पानसरे,डिजिटल मिडीयाच्या मुबई वार्ताच्या संपादिका सहिष्णुता कांबळे,टिव्ही ९ अविनाश माने,पत्रकार विनोद कांबळे,विक्रोळी भाजपा नेत्या व ज्यांनी मास मिडीया ( पत्रकारिता ) शिक्षण पूर्ण केले अश्या नवीन ओळख करुन देणाऱ्या केतकी सांगळे,समाजसेविका जयश्री दिदि खिलारी यांचा सत्कार निलिमा दिदि यांच्या हस्ते करण्यात आला.

# अलिबागमध्ये पथनाट्यातून मतदार जनजागृती



अलिबाग - लोकसभा निवडणूक 2024 च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, पुणे विभागीय कार्यालयामार्फत जिल्हा प्रशासन, रायगड ,नेहरू युवा केंद्र तसेच प्रिझम सामाजिक विकास, संस्था यांचे सहकार्याने रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे मतदार जनजागृती आणि सहभाग कार्यक्रम राबवण्यात आला.

■ याप्रसंगी रायगडच्या निवडणूक शाखेच्या उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे, प्रांताधिकारी मुकेश चव्हाण, नायब तहसीलदार अजित टोळकर, मतदार डिस्ट्रिक्ट युथ आयकॉन तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी,अलिबाग येथील राज्य परिवहन महामंडळाचे आगार व्यवस्थापक अजय वनारसे, केंद्रीय संचार ब्युरोचे प्रसिद्धी सहायक पी. कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

■ लिबाग हे कोकणातील लोकप्रिय असे पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. मुंबई, पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून याठिकाणी पर्यटक विरंगुळ्याचे क्षण घालवण्यासाठी दररोज दाखल होतात. विशेषतः शनिवार, रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशी अलिबाग परिसर हा पर्यटकांच्या गर्दीने फुललेला असतो. या बाबी विचारात घेता पर्यटकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी केंद्रीय संचार ब्युरोमार्फत अलिबाग समुद्रकिनारा आणि अलिबाग बस स्टँड परिसर येथे शनिवार आणि रविवार असे दोन दिवस स्वीपसंदर्भात कार्यक्रम राबवण्यात आले.

# Delhi High Court nixes PIL to stop city school from charging fees for providing AC in classrooms




New Delhi : The Delhi High Court recently dismissed a Public Interest Litigation (PIL) petition seeking a direction that a private school should not charge money for providing air conditioning in classrooms.

Petitioner Manish Goel, whose child was studying in the private school, sought direction to the Delhi Government's Directorate of Education (DoE) to ensure that the school does not charge Rs 2000 per month to provide air conditioning in classrooms.

A division bench of Acting Chief Justice Manmohan and Justice Manmeet Pritam Singh Arora in its May 2 order observed, "Having heard the learned counsel for the parties, we are of the considered opinion that the present petition is not maintainable. The Annexure P-2 filed with this petition is the fee receipt issued by Respondent No 5 School for the session 2023-24 and it duly records the entry of charges for air-conditioner. There is thus a presumption that the said charges have been raised after apprising the DoE of the fee and charge schedule. In view of the admission of the Petitioner that the facility of air conditioning is being provided to the students in the classrooms, prima facie, there is no irregularity in the charge levied by the school".


The bench added the cost for providing air conditioning services to the school children "has to be borne by the parents as it is a facility provided to the children and is no different from the other charges such as lab fee and smart class fee levied".

While selecting schools, the bench said, parents have to be mindful of the facilities and the cost of the facilities provided to their children. The bench also said the "financial burden of providing such facilities cannot be fastened" on the school management alone.

Goel's counsel said the obligation to provide an air-conditioning facility to the students rests with the school management and this facility should be provided by the school from its funds and resources. He stated the levy of this charge on the students is contrary to Rule 154 of Delhi School Education Rules, 1973, adding that though the availability of the facility is not denied but the petitioner should not be charged with the liability to pay the cost.

Meanwhile, the DoE said the Delhi Government is examining the issue. The DoE also said some complaints have been received and an Action Taken Report has been called for, adding a show cause notice has been sent to the school over those complaints.

# Ashoka University Student Government seeks boycott of exchange programme with Tel Aviv University




New Delhi : Ashoka University's student government has urged the vice-chancellor to end all academic and research collaborations with Tel Aviv University, citing the Palestinian death toll of 34,596 in the ongoing Israeli war on Gaza and recent student protests around the world.

The group, which is an elected body of the private university in Haryana's Sonipat, wrote to the vice-chancellor, "Presently, Ashoka University has research partnerships with Tel Aviv University. With this partner, Ashoka has ongoing faculty visits for teaching, student mobility (outbound and inbound), research collaboration, short-term study opportunities, as well as joint programmes"

The students' petition also listed out five issues with the partnership and stated that Tel Aviv University's close ties with the Israeli military and its support for the occupation of Palestinian territories raised serious ethical questions.

"The university's collaboration with institutions involved in human rights violations undermines our commitment to justice and human rights. This includes Tel Aviv's ties with Israeli weapons manufacturers like Elbit Systems. Professors from Tel Aviv University have been involved in drafting the Israeli Occupation Force's (IOF) code of ethics, providing legal defense to IOF members for war crimes and drafting doctrines that dictate military operations," the petition said.

The student government's petition also mentioned the Boycott, Divestment and Sanctions (BDS) movement, which calls for the boycott of companies accused of being complicit in the war on Gaza.

It further said that all Palestinian universities had been demolished by the Israeli forces, Tel Aviv University "continue to exist to stifle conversation around the Palestinian people and to prevent Palestinian scholarly work" and that the institution allegedly receives funding and benefits from tie-ups with weapons manufacturers and Israeli intelligence agencies such as Shin Bet and Mossad.

The petition said that Tel Aviv University has a responsibility to uphold the principles of academic freedom, social justice and human rights. "By maintaining ties with a university linked to systematic human rights abuses, Ashoka University is complicit in these violations," it said, adding that with the international community raising concerns over the war, Ashoka University should demonstrate its commitment to ethical conduct and human rights.

"Therefore, we call upon Ashoka University to immediately suspend all existing academic and research collaborations with Tel Aviv University," the petition said.

# Tree activists file a police complaint after 300-year-old tree axed at Santacruz

Mumbai : Following the ruthless axing of a 300-year-old baobab tree for Metro-2B work on April 27 in Santacruz, tree enthusiasts organised a peaceful protest outside Muktanand Park on Sunday, only to have their plans disrupted.

Angry members of The National Society of the Friends of the Trees (NS-FOT) opted to file a police complaint against MMRDA and BMC at the Santacruz police station, accusing them of violating environmental protection provisions.

Meanwhile, enthusiasts of baobabs explored St John the Baptist Church in the SEEPZ industrial area, which opens only once a year to the public and is renowned for hosting 13 baobab trees aged over 300 years. Another baobab thrives within the Tata Institute of Fundamental Research (TIFR) compound, two at Byculla Zoo, and the oldest, over 1,000 years old, stands within the Bhabha Atomic Research Colony (BARC). Tree enthusiasts are fervently advocating the conservation of



these botanical treasures.

NS-FOT had been pleading with the authorities for years to safeguard the 300-year-old baobab tree in Santacruz. "Despite assurances that it would be protected, we were dismayed to discover that on April 27 midnight, it was ruthlessly cut down for Metro2b work and all evidence of its existence erased," said Sakina Gadiwala, general secretary, NS-FOT. Added Dr Arun Sawant, president, NS-FOT, "We filed a complaint at the police station. This is a criminal act and an abuse of power."

Sawant mentioned the case of a similar baobab tree when Pedder Road underwent expansion. Dr Homi Bhabha, a Nature lover spearheaded the effort with FOT, leading to the successful transplantation of the tree in the TIFR complex at Colaba. Subsequently, four additional baobab trees were propagated from it. "Today, it stands proud and has the best avenue of trees in Mumbai," said Sawant. "We could have helped save the one in Santacruz too."

Sawant also mentioned a baobab tree in the BARC compound at Chembur, which is reputed to be the oldest in Mumbai, surpassing 1,000 years in age. (The oldest baobab tree in India, documented in Tamil Nadu, is estimated to be 3,000 years old). Sawant explained that tree age was verified through annual ring formation and compression. "We also compare them with similar trees in other parts of the world where records are available," he said.

In the meantime, tree enthusiasts explored St John the Baptist Church in Andheri East, located in the SEEPZ area, on Sunday. This historic church, dating back 440 years, is home to 13 baobab trees, which are only accessible to the public once a year. The baobab trees, with heights reaching up to 98 feet, were brought to our shores by the Portuguese from Madagascar. Andheri alone boasts 13 of these remarkable trees while botanists claim there are around 200 more scattered from Navy Nagar to Vasai Fort.

Advocate Godfrey Pimenta who visited the church premises on Sunday said that he cherished his childhood memories of the area surrounding the now-abandoned church. In the 1970s, the landscape within the SEEPZ Complex was abundant with thousands of cashew, mango and baobab trees with the occasional mahua," he said. "My friends and I frequently ventured there to gather cashews and mangoes. Devool Talao, now named Devool Lake, was a tranquil spot where local women washed clothes while men fished. Occasionally, film crews would shoot scenes amidst the church ruins. The baobab tree fruits, when dried, have a powdery texture and tart flavour."

